# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः11.07.2024** **वारःगुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची व्हिएन्नात ऑस्ट्रियाचे चॅन्सेलर कार्ल नेहमर यांच्याशी चर्चा. ऑस्ट्रिया दौरा ऐतिहासिक आणि अतिशय उत्पादक झाल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.
2. वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये रूपांतरित करण्यात आलेल्या जिल्हा आणि प्रादेशिक रुग्णालयांना केंद्राकडून निधीचा पुरवठा होत राहील - आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाचं स्पष्टीकरण.
3. कठुआ हल्ल्यात सहभागी झालेल्या दहशतवाद्यांचा कसून शोध सुरू, 20 हून अधिक जण चौकशीसाठी ताब्यात,
4. आसामच्या 27 जिल्ह्यांमधील 14 लाखांहून अधिक लोकांना पुराचा तडाखा, मृतांची संख्या 84 वर, आणि
5. भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील वीस षटकांच्या पाच सामन्याच्या मालिकेतील तिसऱ्या सामन्यात भारताचा 23 धावांनी विजय.

**<u>पंतप्रधान ऑस्ट्रिया</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑस्ट्रियाचे चॅन्सेलर कार्ल नेहमर यांच्याशी काल व्हिएन्नामध्ये चर्चा केली. गुंतवणूक आणि व्यापार, विज्ञान आणि तंत्रज्ञान, पर्यावरणपूरक ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्टार्टअप्स, पर्यावरण आणि हवामान बदल, सांस्कृतिक सहकार्य यांच्यासह द्विपक्षीय संबंधांबाबतच्या विविध मुद्द्यांवर त्यांनी चर्चा केली. उभय देशांच्या दृष्टीनं महत्त्वाच्या असलेल्या विविध विषयांवर दोन्ही नेत्यांनी मतं मांडली.

लोकशाही आणि न्यायप्रक्रियेवरचा विश्वास हा भारत-ऑस्ट्रिया संबंधांचा सबळ पाया असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी नमूद केलं. नेहमर यांच्याबरोबर अतिशय अर्थपूर्ण चर्चा झाली आणि परस्पर सहकार्य वाढवण्याच्या नवीन शक्यताही चर्चेत पुढं आल्याचं ते म्हणाले. हे संबंध धोरणात्मक दिशेनं पुढं नेण्याचा निर्णय दोन्ही नेत्यांनी घेतल्याचंही त्यांनी सांगितलं. ही युद्धाची वेळ नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला आणि युक्रेन आणि पश्चिम आशियासह विविध संघर्षांबाबत सविस्तर चर्चा झाल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. संयुक्त राष्ट्रं आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना कालसुसंगत आणि परिणामकारक बनवण्यासाठी सुधारणांची गरज असल्यावर चर्चेत एकमत झालं.

ऑस्ट्रियाचे चॅन्सेलर कार्ल नेहमर यांनी पायाभूत सुविधा, डिजिटलायझेशन आणि पायाभूत सुविधांचा वेग या गोष्टींबाबत भारताचं यश थक्क करणारं असल्याचं मत व्यक्त केलं. मोदी रशिया आणि ऑस्ट्रियाच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर होते आणि काल दौऱ्याचा शेवटचा दिवस होता. काल मोदी यांचं काल व्हिएन्नामध्ये समारंभपूर्वक स्वागत करण्यात आलं. भारतीय नागरिकांनी त्यांचं उत्साहात स्वागत केलं. गेल्या 41 वर्षांतला भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच ऑस्ट्रिया दौरा आहे. हा दौरा आटोपून पंतप्रधान आज सकाळी मायदेशी परतले आहेत.

**<u>भारतीय समुदाय संवाद</u>**

भारत आणि ऑस्ट्रिया यांच्यातले संबंध फक्त सरकारी पातळीवरचे नाहीत, तर जनतेचा सहभागानं ते दृढ झाले आहेत, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल स्पष्ट केलं. व्हिएन्नामध्ये भारतीय नागरिकांशी ते संवाद साधत होते. भौगोलिकदृष्ट्या दोन्ही देश दूर असले, तरी दोन्ही देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर साम्य असल्याचं त्यांनी नमूद केलं. लोकशाही दोन्ही देशांना जोडते, असं त्यांनी सांगितलं आणि स्वातंत्र्य, समानता, विविधता आणि न्यायसंस्थेवरचा विश्वास यांच्या बाबतीत दोन्ही देशांमध्ये साम्य आहे असं स्पष्ट केलं. निवडणूक या घटकात या मूल्यांचं प्रतिबिंब उमटतं असं मत त्यांनी व्यक्त केलं. पंतप्रधान मोदी यांनी बिरगिट केलनर, डॉक्टर मार्टिन गेन्सझल, डॉक्टर कॅरिन प्रेसेंडान्झ आणि डॉक्टर बोराइन लारिओस यांची भेट घेतली. या संशोधन आणि शिक्षणतज्ज्ञांनी भारतीय इतिहास आणि संस्कृतीचे विविध पैलू उलगडण्यासाठी मोठी मेहनत घेतल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या एका संदेशात म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान-अर्थतज्ञ</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत नामांकित अर्थतज्ज्ञांशी संवाद साधणार आहेत. आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत ते या अर्थज्ज्ञांची मतं आणि सूचना जाणून घेतील. अर्थतज्ज्ञांसह नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी आणि इतर सदस्यही या बैठकीत उपस्थित असणार आहेत. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन 22 जुलैपासून सुरू होणार असून, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन 23 जुलैला अर्थसंकल्प सादर करणार आहेत. मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळातला हा पहिलाच अर्थसंकल्प असणार आहे.

**<u>जागतिक लोकसंख्या दिवस</u>**

जागतिक लोकसंख्या दिन आज पाळण्यात येत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळं निर्माण होणारी आव्हानं आणि संधी यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी दरवर्षी 11 जुलै हा दिवस पाळला जातो. लोकसंख्येशी संबंधित समस्यांचं निराकरण करणं आणि शाश्वत भविष्यासाठी कार्य करण्याची आठवण या दिवसानिमित्त करुन दिली जाते. 11 जुलै 1990ला 90 पेक्षा जास्त देशांमध्ये प्रथम हा दिवस पाळण्यात आला. यावर्षीच्या दिनाची मध्यवर्ती संकल्पना कोणालाही दुर्लक्षित करु नका, सर्वांचा विचार करा अशी आहे.

**<u>वैद्यकीय-निधी</u>**

वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये रूपांतरित करण्यात आलेल्या जिल्हा आणि प्रादेशिक रुग्णालयांना केंद्र सरकारकडून निधीचा पुरवठा होत राहील असं आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. केंद्रीय आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा यांनी याबाबत राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र पाठवून स्पष्टीकरण दिलं आहे. अशा 157 रूपांतरित वैद्यकीय महाविद्यालयांपैकी 108 आधीच कार्यान्वित झाल्याचं या पत्रात नमूद करण्यात आलं आहे. सध्या देशात 706 वैद्यकीय महाविद्यालयं आहेत.

**<u>दूरसंचार</u>**

भारताला प्रत्येकक्षेत्रात 'आत्मनिर्भर' करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार दूरसंचार आणि नेटवर्किंग उत्पादनांसाठीच्या तसेच इलेक्ट्रॉनिक उत्पादनांच्यामोठ्या प्रमाणातील इलेक्ट्रॉनिक उत्पादनासाठी पीएलआय अर्थात उत्पादनाशी संलग्न प्रोत्साहन योजनेमुळे देशातील उत्पादन, रोजगार निर्मिती, आर्थिक विकास आणि निर्यातीमध्ये वाढ झाली असल्याचं दूरसंचार आणिमाहिती आणि प्रसारण

मंत्रालयानं म्हटलं आहे. दूरसंचार विभागासाठी पीएलआय लागू केल्यापासून तीन वर्षांच्या कालावधीत, या योजनेत 3 हजार 4 शे कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित झाली असून, दूरसंचारसंबंधी उपकरण उत्पादनांनी 50 हजार कोटी रुपयांचामहत्त्वाचा टप्पा पार केला आहे. या साहित्याची एकंदर निर्यात अंदाजे 10 हजार 5 शे कोटी रुपयांवर पोहोचली आहेआणि त्यातून 17 हजार 8 शे प्रत्यक्ष तर मोठ्या प्रमाणात अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती झाली असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**कृषी-पुरस्कार**

पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षिता यांच्या माध्यमातून राज्याकडून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेत, 15 व्या कृषी नेतृत्व समितीचा 2024 चा प्रतिष्ठित सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांच्या हस्ते हा पुरस्कार काल नवी दिल्लीत स्वीकारला. पुरस्कार स्वीकारताना मुख्यमंत्री म्हणाले की महाराष्ट्र कृषी क्रांतीचं जनक राज्य आहे. हा पुरस्कार राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सन्मान आहे. शेतकऱ्यांचं कष्ट, मेहनत आणि मातीवरच्या प्रेमाची ही फलश्रुती आहे. आमच्या शेतकऱ्यांना 'अन्नदाता' म्हणून मान दिला जातो आणि राज्य सरकारनं त्यांच्या हितांसाठी सर्वोच्च प्राधान्य दिलं असल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं.

**उडीद**

उडीद डाळीच्या भावांमध्ये घट होण्यास सुरुवात झाली आहे. केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालय आणि केंद्र सरकारनं सातत्यानं केलेल्या प्रयत्नांमुळे ही घट होऊ लागली आहे. शेतकऱ्यांच्या हिताला बाधा न आणता केलेल्या उपाययोजनांमुळे ग्राहकांसाठीच्या भावांमध्ये त्यामुळे घट होऊ लागल्याचं केंद्रीय ग्राहक मंत्रालयानं म्हटलं आहे. या उपाययोजनांमुळे गेल्या आठवड्याच्या तुलनेत उडीदाचे भाव इंदूरमधील बाजारपेठेत 3 पूर्णांक 12 शतांश आणि दिल्ली बाजारपेठेत 1 पूर्णांक 8 शतांश टक्क्यांनी कमी झाल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. उडीदाचं लागवड क्षेत्र 5 लाख 37 हजार हेक्टर झालं आहे. गेल्या वर्षी ते 3 लाख 67 हजार हेक्टर होतं.

**गोपालरत्न पुरस्कार**

राष्ट्रीय गोपालरत्न पुरस्कारांसाठीची नामांकनं स्वीकारायला 15 जुलैपासून सुरुवात होणार आहे. 31 ऑगस्टपर्यंत नामांकनं सादर करता येतील. राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीनं ही नामांकनं सादर करता येणार आहेत. राष्ट्रीय दुग्धदिन म्हणजे 26 नोव्हेंबरला हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. दुग्ध उत्पादक शेतकरी, दुग्धविकास संघटना आणि इतरांना प्रोत्साहन देण्यासाठी दर वर्षी हे पुरस्कार दिले जातात.

**जम्मू-काश्मीर- दहशतवादी**

जम्मू आणि काश्मीरमध्ये, कठुआ हल्ल्यात सहभागी झालेल्या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी 20 हून अधिक जणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे, तर आज चौथ्या दिवशी मोठ्या प्रमाणावर शोध सुरू आहे. या हल्ल्यात पाच जवानांना वीरमरण आलं होतं. घनदाट जंगलात अधूनमधून मुसळधार पाऊस आणि धुके असतानाही कठुआ, भदरवाह आणि उधमपूर भागात मोठ्या प्रमाणावर शोधकार्य सुरू आहे. हा भूभाग अतिशय अवघड असून प्राणघातक हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांचा माग काढण्यासाठी कसून शोध सुरु आहे. लष्कराचे एलिट पॅराट्रूपर्ससह शोध पथकांना हेलिकॉप्टर आणि UAV निगराणी, प्रशिक्षित श्वान यांच्याद्वारे मदत करण्यात येत आहे. सोमवारी दहशतवाद्यांनी कठुआ जिल्ह्यातील बदनोटा

गावाजवळ लष्कराच्या दोन वाहनांवर गोळीबार केला, यात लष्कराचे पाच जवान कामी आले आणि पाच जण जखमी झाले.

**<u>आसाम-पूर</u>**

आसाममध्ये गेल्या 24 तासांत पुरांमध्ये आणखी पाच जणांचा मृत्यू झाला असून, या हंगामात पुरामुळे मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या 84 वर पोहोचली आहे. 27 जिल्ह्यांमध्ये 14 लाखांहून अधिक लोकांना पुराचा तडाखा बसला आहे. पूरस्थितीमध्ये थोडी आणखी सुधारणा झाली असली तरी 86 महसूल मंडळातील 2500 हून अधिक गावं अजूनही पुराच्या तडाख्यात आहेत आणि राज्यभरात 39 हजार हेक्टरपेक्षा जास्त पीक क्षेत्राचं नुकसान झाले आहे. ब्रह्मपुत्र, बुन्हिडीहिंग, दिसांग आणि कुशियारा नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. दरम्यान, भारतीय हवामान खात्याने आसाममधील तुरळक ठिकाणी मुसळधार ते अत्यंत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

**<u>युरो-फुटबॉल</u>**

युरोपियन फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत इंग्लंडनं आज सकाळी झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात द नेदरलँड्सवर 2-1 असा विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. येत्या 15 तारखेला इंग्लंड आणि स्पेन दरम्यान जेतेपदाची लढत होईल.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील वीस षटकांच्या पाच सामन्याच्या मालिकेतील काल झालेला तिसरा सामना भारताने 23 धावांनी जिंकला आहे. त्यामुळे या मालिकेत भारताने 2-1 अशी आघाडी घेतली आहे. कर्णधार शुभमन गिलच्या अर्धशतकाच्या जोरावर भारताने जिम्बाब्वेसमोर 182 धावांचं उद्दिष्ट ठेवलं होतं. प्रत्युत्तरादाखल यजमान संघाचा डाव 159 धावांत संपुष्टात आला. डीऑन माईर्सने सर्वाधिक 65 धावा केल्या. भारताकडून वॉशिंगट्न सुंदरने सर्वाधिक 3 बळी घेतले. मालिकेतील चौथा सामना 13 जुलैला होणार आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.